# सुधारित सर्व साधारण सूचना

१. जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत विभाग स्तरावरील सहाय्यक अभियंता संवर्गाची पदे भरण्याकरिता सेवा निवृत्त अभियंतांची नामिकासूची (Panel) तयार करण्यात येत आहे.

२. सदर पदे भरण्याकरिता सहाय्यक/कनिष्ठ अभियंता पदावर रुजू होऊन सेवानिवृत्त झालेल्या व विहीत गुणवत्ता धारण करणाऱ्या अभियंत्यांकडून खालील सर्वसाधारण अटी व शर्तीचे अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

I. पात्र अभियंत्यांची नामिकासूची (Panel) तयार करण्यात येईल व नामिकासूचीची वैधता ३ वर्षाकरिता असेल. नामिकासूचीतील अभियंत्यांची आवश्यकतेनुसार प्रकल्पात नियुक्ती केली जाईल.

II. प्रकल्पातील सहाय्यक अभियंता पदासाठी अर्ज करणाऱ्या सेवा निवृत्त अभियंत्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु नसावी.

III. प्रकल्पातील नियुक्ती प्रथम एक वर्षाकरिता व तदनंतर आवश्यकतेनुसार कमाल २ वर्षाकरिता अशी कमाल ३ वर्षाकरिता असेल. असे असले तरी प्रस्तुत नियुक्त्या हया प्रकल्पासाठी मंजुर पदांवर केल्या जात असल्याने शासनाकडून नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

IV. प्रकल्पामार्फत दिले जाणारे परिश्रमिक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार असतील.

V. वयोमर्यादा सेवा निवृत्त अभियंता नियुक्तीनंतर वयाच्या ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील. आवश्यकतेनुसार सदरची वयोमर्यादा ७० वर्षापर्यंत सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने वाढविण्यात येईल.

VI. नामिकासूचीकरिता अर्ज करणारा सेवानिवृत्त अभियंता शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

VII. नियुक्त सेवानिवृत्त अभियंत्यास प्रकल्पात नियमित होणेबाबत कोणतेही अधिकार / हक्क नसतील.

VIII. नियुक्त सेवानिवृत्त अभियंत्यांच्या सेवा गैरवर्तन, कामकाजात चुकारपणा, आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, हितसंबंध संघर्ष (Conflict of interest) इ. कारणास्तव समाप्त करण्याचे अधिकार प्रकल्पास राहतील.

IX. वरील अटी व शर्ती शिवाय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदी लागू राहतील.

३. जाहिरातीमध्ये नमुद पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव व कामाचे स्वरूप या बाबतचा तपशील https://www.smart-mh.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रकल्पाच्या गरजेनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार प्रकल्पाने राखून ठेवले आहेत.

४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,अनुभव व इतर अनुषंगिक कागदपत्रे /प्रमाणपत्रे स्वस्वाक्षरीत करून सादर करणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जावरील फोटोवर स्वाक्षरी करावी.

५. सेवानिवृत्त अभियंत्यांनी अर्जासोबत महालेखाकार यांचे सेवानिवृत्ती वेतन आदेश सादर करावेत.

६. सेवानिवृत्त अभियंत्यांनी विहित नमुन्यातील अर्ज https://www.smart-mh.org या संकेतस्थळावरून download करून परीपूर्ण अर्ज खालील पत्त्यावर दि. १०/१/२०२३ रोजी सायकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावेत. विहित वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

प्रकल्प संचालक,
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
प्रकल्प समन्वय़ व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा,
सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६

७. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र सेवानिवृत्त अभियंत्यांना प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल.

८. जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिताची निवड प्रक्रिया, अटी शर्ती इ. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार राहतील.

९. निवड प्रक्रिया राबविण्याबाबतचे अंतिम अधिकार प्रकल्पाकडे राखीव असतील.

१०. मुलाखतीसाठी येणाऱ्या सेवानिवृत्त अभियंत्यांना प्रवास खर्च अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च प्रकल्पाद्वारे अदा करण्यात येणार नाही.

********************